# राज्यस्तरावरील **नवोपक्रम** स्पर्धा

## विषय सहाय्यक व विषय साधन व्यक्ती विभाग

**शिर्षक**

# शाळाबाह्य मुलांची उंच भरारी


विषय साधन व्यक्तीचे नाव

श्रीमती. खालिदा जुबेर जमादार

गटसाधन केंद्र तालुका रत्नागिरी

पंचायत समिती शिक्षण विभाग रत्नागिरी


सन **2023-24**

# ऋणनिर्देश

प्रस्तुत नवोपक्रम सादरीकरणात उपक्रम त्याला अनेक हातांनी मदत केले. त्यांच्याविषयी ऋण व्यक्त करणे हे नवोपक्रम करता आपले आद्य कर्तव्य मानतो त्यांच्या सहकार्यामुळेच नवोपक्रम कर्त्याला शाळाबाह्य मुलांची उंच भरारी प्रस्तुत उपक्रम सादर करणे शक्य झाले.या उपक्रमासाठी तत्कालीन प्राचार्या मा.श्रीमती अनुपमा तावशीकर मॅडम मार्गदर्शिका अधिव्याख्याता मा.श्रीमती दीपा सावंत तसेच गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रेरणा शिंदे शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक तसेच सर्व अधिव्याख्याता यांचे नवोपक्रम करता आभार मानू इच्छिते. ज्या शाळेत विद्यार्थ्यांना दाखल केले त्या शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक तसेच शिक्षक उत्तर कर्मचाऱ्यांचे व पालकांचे सहकार्य लाभले

सर्व ज्ञात व अज्ञात व्यक्तींच्या सहकार्याबद्दल नवोपक्रम करता सदैव ऋणात राहू इच्छितो.

**धन्यवाद!**


| शीर्षक | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|
| ऋणनिर्देश | २ | |
| प्रतिज्ञापत्र | ४ | |
| प्रमाणपत्र | ५ | |
| प्रस्ताविक | ६ | |
| नवोपक्रमाची गरज व महत्त्व | ७ | |
| उपक्रमाची उद्दिष्टे | १० | |
| नवोपक्रमाचे नियोजन | १० | |
| नवक्रमाची कार्यपद्धती | २६ | |
| यशस्विता व फलनिष्पत्ती | ३६ | |
| समारोप | ३८ | |
| अभिनंदन पत्र व क्षणचित्रे | ३९ | |

# प्रतिज्ञापत्र

मी श्रीम. खालिदा जुबेर जमादार विषय साधन व्यक्ती प्रतिज्ञापत्र लिहून देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर अनुभवावर आधारित आहे हा उपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे काल्पनिक नाही.तसेच भारतीय किंवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधार हा उपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचे सूक्ष्म अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा उपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीयन उपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही तसेच हा उपक्रम इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन मी माझ्या नावावर सादर केलेला नाही तसे आढळून आल्यास तो **copyright act 1957** खालील दाखल पात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक: **09/12/2023**

स्थळ: रत्नागिरी



स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव: श्रीम. खालिदा जुबेर जमादार

**पंचायत समिती रत्नागिरी**

**गटशिक्षणाधिकारी ,शिक्षण विभाग, रत्नागिरी 415612**

अजगांवकर सभागृह, महागांवकर सायकल मार्ट समोर, संस्कृती गार्डन संकूल शेजारी, शिवाजी नगर, रत्नागिरी

दुरध्वनी क्र220537-02352. ई -मेल-rtnbrc@yahoo.com / beortn@gmail.com

---

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्रीमती खालिदा जुबेर जमादार विषय साधन व्यक्ती या माझ्या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सदर केलेला **शाळाबाह्य मुलांची ऊंच भरारी** हा उपक्रम शैक्षणिक वर्ष 2022- 23 मध्ये त्यांनी स्वत: राबवलेला असून ती त्यांच्या परिश्रमाची फलश्रुती आहे हा उपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे MSCERT मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रमासाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 08/12/2023 कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

स्थळ : रत्नागिरी नाव : प्रेरणा शिंदे

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, रत्नागिरी

Dec 9, 2023, 23:19

## प्रस्ताविक

शिक्षण क्षेत्रात आपणास जर एक दोन महिन्याने सर्वेक्षण हा विषय कानावर पडतो. सर्वेक्षण आपण का करीत असतो की, आपल्या क्षेत्रात स्थलांतरित होऊन आलेली मुलं असतात. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून टिकवणे ही शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची बाब आहे. शाळाबाह्य असणाऱ्या प्रत्येक मुलाला शाळेत आणणे व त्यांना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे हे सर्वांची जबाबदारी आहे.

RTE 2009 नुसार सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार आहे तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम 2005 च्या मूलभूत तत्त्वानेच "प्रत्येक मूळ शिकू शकतो". हे तत्व साध्य होते मुलं स्थलांतरित झाल्याने भाषेच्या समस्येमुळे मूळ खूप कमी प्रमाणात शाळेच्या प्रवाहात टिकतात त्यांना टिकवण्यासाठी जर प्रयत्न केले तर नक्कीच ती मुलं शाळेत टिकून त्यांची गुणवत्ता वाढते सहज माझ्या उपक्रमातून हे करता आले व मुलांना शाळेच्या प्रवाहात टिकविता आले.

## गरज व महत्त्व

काही संशोधनावरून लक्षात आले की मुलं शाळाबाह्य झाली. मुलांना घरात राहण्याची सवय झाली. पालकांची ही आर्थिक स्थिती खालावल्यामुळे पालक स्थलांतरित झाले. अशा परिस्थितीत पालकांचे लक्ष आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे कमी झाले. हे सर्व विचार माझ्या मनात पुन्हा पुन्हा येत होते. आर .टि .ई 2009 . नुसार प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. त्यानुसार 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकास शिक्षण मिळवून देणे बालकांना नियमित शाळेत आणणे व गुणवत्ता पूर्ण शिक्षण प्राप्त करून देणे हे बालरक्षक यांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे.आजचे अप्रगत उद्याचे शाळाबाह्य बालक आहे शाळाबाह्य मूल बालमजुरी कडे वळण्याची दाट शक्यता असते म्हणून प्रत्येक मुलाला गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळाले तर ते शाळाबाह्य होण्याची शक्यता कमी असते. यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अगत्याचे ठरते.

साधन व्यक्ती म्हणून नोकरीला लागल्यापासून दरवर्षी सर्वेक्षण असतं दरवर्षी आपण मुलांना शाळेच्या प्रवाहात आणतो. ही सर्वच मुलं शाळेच्या प्रवाहात टिकत नाही असे माझ्या लक्षात आले तर मागील सहा वर्ष मी अशा मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे व 100 पेक्षा जास्त मुलांना दाखल केले आहेत पण सर्वच मुलं शाळेत टिकत असे नाही काही मुलं स्थलांतरित होतात. तेव्हा माझ्या लक्षात आले की आपण पालकांचे जर व्यवस्थित समुपदेशन केले व मुलांना समजून घेतले आणि शिक्षकांशी चर्चा केली. तरीही मुलं नक्की शाळेच्या प्रवाहात टिकतील त्यांच्या अडचणींना समजून घेणे हे महत्त्वाचे होते अशा पद्धतीने मी मागील दोन वर्षात 50 टक्के मुलांना शाळेत टिकवण्याचे काम केले. जरी काही मुलं स्थलांतरित झाली तर त्या आपापल्या जिल्ह्यात शाळेत जात आहेत. 2022- 23 व 2023 24 मध्येही मी काही मुलं दाखल केली ती सर्वच मुलं शाळेच्या प्रवाहात टिकून आहेत. आदरणीय दिपा सावंत मॅडम प्रोत्साहित करत असतात. नेहमी मागील दोन-तीन वर्षात मी ज्या मुलांना शाळेत दाखल केले त्या मुलांना टिकविण्यासाठी मी जे प्रयत्न केले ते उपक्रम सादर करीत आहे

सदर उपक्रम करण्याआधी माझ्या असे लक्षात आले की जसे मी माझ्या दाखल केलेल्या मुलांची जसे तहसीना मरिअमा मेघेरी मेहेक अंजुम जोया सुरज इतर सर्वांशी मी मन मोकळेपणाने बोलले व तसेच त्यांच्या पालकांशी चर्चा केली तर मला त्यांच्या समस्या समजतील. माझ्या कार्यालयीन कामातून मला जेव्हा

जेव्हा वेळ मिळायचे तेव्हा मी त्यांच्या पालकांना फोन करून तसेच पालक भेटी करून त्यांच्याशी चर्चा करत असे आणि मला लक्षात आले की त्यांच्या काय अडचणी आहेत.त्यांची शैक्षणिक साहित्याची गरज तसेच शाळा व त्यांची झोपडी व घर यांच्यातील असणारा अंतर व पालक कामाला गेल्यानंतर त्यांना शाळेत आणणे व सोडणे ही अडचण अशा प्रकारे बऱ्याच अडचणी तसेच त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी त्यांच्याकडे असणारे पुरावे या सर्व गोष्टींचा विचार केला व एक एक समस्या सोडवण्यात मला यश येत गेले तेव्हा मला नवोपक्रम लिहिण्याची गरज वाटली की जर आपण अशा मुलांच्या समस्या सोडू शकलो तर त्यांना आपण टिकवू शकतो त्यांच्याशी बोलण्याची भाषा प्रेमळ असली तर नक्कीच आपण त्या मुलांना त्या प्रवाहात टिकू शकतो माझे हे प्रयत्न इतर शिक्षकांनाही नक्कीच उपयोगी पडतील व आपण सर्वजण ड्रॉप बॉक्स मधील मुलांच्या समस्या सोडू शकतो.

शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हे उपक्रम हाती घेण्याआधी माझ्या पाठीशी मरिअमा मेघरी हिचा खूप चांगला व यशस्वी अनुभव होता. या मुलीला इयत्ता तिसरीत असताना मी शाळेत दाखल केले होते तेव्हा ती शाळेत एकही दिवस गेलेली नव्हती पण श्रीमती ढेरे मॅडम यांच्या मदतीने तिने सहा महिन्यात लिहिणं वाचणं व गणन क्रिया शिकला. ती घरात असून फक्त आपल्या छोट्या भावाला सांभाळत असे व एवढ्या लहान वयात भाकऱ्याही करत असे. जेव्हा ती इयत्ता चौथीत होती तेव्हा कोरोनाला सुरुवात झाली. शाळा बंद झाल्या आणि मरिअमा कर्नाटकामध्ये गेली ती परत दीड वर्ष शाळाबाह्य होती मी तिच्या पालकांनाही फोन करून सांगितलं की त्याठिकाणीच्या शाळेत दाखल करा परंतु ती मला फोन करून सांगायची की मॅडम मला तिकडच्या शाळेत नाही जाणार माझी आजीची तब्येत बरी झाली की आम्ही परत रत्नागिरीत येणार आहोत. शेजारच्यां मोबाईलवर ती माझ्याकडून अभ्यास घेत असे. आणि जेव्हा जानेवारी 22 मध्ये आली तेव्हा तिने मला फोन केला. तेव्हा मी तिला नाचणे नं 1 नंबर एक या उच्च प्राथमिक शाळेत दाखल केले सुरुवातीला खूप अडचणी आल्या की ती एक वर्ष कुठे होते परंतु खूप प्रयत्नाने तिला परत शाळेत दाखल केले सध्या ती इयत्ता आठवी गोदूताई जांभेकर हायस्कूल येथे शिकत आहे. ती सुरुवातीपासून शाळेतील प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने भाग घेते तिची बहिण ही इयत्ता सहावी मध्ये शिकत आहे. जेव्हा मरिअममला तिसरी मध्ये दाखल केले होते तेव्हा तिच्या बहिणीला इयत्ता पहिली मध्ये दाखल केले होते. मरिअम्माची

ही उंच भरारी माझ्यासाठी प्रेरणा होती अशा प्रकारे मी बरेच शाळा विद्यार्थ्यांना दाखल केली एक विद्यार्थी इंग्रजी मिडीयम मधून मुंबईहून आली होती परंतु घरची आर्थिक परिस्थिती अशी होती की इंग्रजी मिडीयम शाळेत दाखल करू शकत नव्हते. त्यामुळे ती काही दिवस शाळाबाह्य होती. काही दिवस ही न देता तिला कमलाबाई विसपुते शाळेत दाखल केले सध्या ती इयत्ता बारावी मध्ये शिकत आहे.

2022-23 मध्ये जेव्हा माझे संपर्क पाल कुटुंबांशी आले ज्यांची तिन्ही मुलं शाळाबाह्य होते करोना कालावधीतही त्या आपल्या गावात दोन वर्ष शाळेत केलेली नव्हती आणि इथे येऊन त्यांना दोन महिने झाले होते जवळच्या इंग्रजी माध्यम शाळा होत्या नगरपरिषद व जिल्हा परिषद ची शाळा सहा सात किलोमीटर अंतरावर कुठेच नव्हती. जेव्हा त्या मुलांना प्रयत्न करून ओके देसाई शाळेत दाखल केले तेव्हा त्या पालकांच्या डोळयातून येणारे अश्रू व त्यांचे शब्द मॅडम आप हमारे लिए "भगवान के समान हो". त्यांना प्रेमळ भाषेत केलेले मार्गदर्शन व त्यांना मार्गदर्शनामुळे मिळालेली दिशा यावरून माझ्या लक्षात आले की जर खरच आपण अशा प्रकारे उपक्रम लिहिला तर कित्येक पालकांच्या समस्या मार्गी लागतील कारण त्या पालकांकडे शाळेत दाखल करण्यासाठी काहीच पुरावे नव्हते एकाचा आधार कार्ड होता पण बर्थडेट चुकीची होते त्यामुळे ते व मागील दोन वर्ष ते कोणत्या इत्तेत होते ही पालकांना माहीत नव्हते व त्यांना मार्गदर्शन करून त्यांचे ब्लड टेस्ट करून त्यांना जेव्हा त्यांची बर्थ डेट सांगण्यात आली तेव्हा त्यांना समाधान वाटले अशाप्रकारे खरंच आपण पालकांचे समुपदेशन केले व त्यांना मार्ग दाखवले तर त्यांच्या नक्कीच समस्या सुटतील व शाळाबाह्य मुलं शाळेत दाखल होऊन टिकून राहतील खालील मुद्द्यानुसार मला शाळाबाह्य मुलांना दाखल करण्याची गरज वाटले.

1) शाळाबाह्य मुलांच्या समस्या व पालकांच्या समस्या समजणे

२) भाषिक अडथळयामुळे ज्या विद्यार्थ्यांना शाळेची भीती वाटते त्यांची भीती दूर करणे

3) अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व प्रोत्साहित करणे

४) शाळाबाह्य मुलांना शाळेत टिकविण्यासाठी शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी मदत करणे

५) शाळाबाह्य मुलांना दाखल करून गुणवत्ता वाढविण्यासाठी

# **नवोपक्रमाची** उद्दिष्टे

१) स्थलांतरित झालेल्या मुलांना शाळेत दाखल करणे

२) शाळाबाह्य मुलांना दाखल केल्यावर त्या मुलांना शाळेत टिकविणे

३) शाळाबाह्य दाखल केलेल्या मुलांना आवश्यक शैक्षणिक साहित्य व इतर बाबी मिळवून देणे

४) शाळेत दाखल केलेला स्थलांतरित मुलांची गुणवत्ता वाढविणे

# नवोपक्रमाचे नियोजन

## उपक्रम पूर्वस्थिती

रत्नागिरी तालुक्यात आपण पाहिलं तर प्रामुख्याने चिरा खाण कामासाठी तसेच रस्ते बांधकाम पाणी पाईपलाईन बांधकाम , आंब्याच्या बागेत राखण करण्यासाठी नेपाळी .तसेच छोटे मोठे व्यवसाय करण्यासाठी ही कुटुंब स्थलांतरित होतात . स्थलांतरित झालेले कुटुंब तीन/चार महिने येथे राहतात व पावसाळा सुरू होण्याच्या आधी परत आपल्या गावी जातात. मागील पाच वर्ष मूल दाखल करीत असताना असे आढळून आले की, स्थलांतरित झालेली जी मुले शाळेत दाखल होतील ती नियमित येत नाही. पालक अशिक्षित असल्याने त्यांनाही शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्या मुलांना ते स्वतः कामासाठी सोबत घेऊन जात असत अशा पालकांचे समुपदेशन करणे गरजेचे वाटले

नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपल्या सभोवतालचे वय वर्ष तीन ते अठरा मधील प्रत्येक मूल अंगणवाडी शाळा येथे दाखल होणे व दाखल झाल्यावर ते म्हणते ते रमणे टिकणे व त्यानंतर त्या मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून त्याचा सर्वांगीण विकास होणे हे साध्य करणे ही बालरक्षकाची भूमिका आणि यासाठीच बालरक्षकांनी अविरत काम करायचे असते या कामासाठी माझ्यातला बालरक्षक जागा असतो दरवर्षी नवीन अनुभव घेऊन दाखल केलेल्या मुलांना टिकविण्याचे काम मी करीत असते.हे काम माझ्यापर्यंतच मर्यादित न राहता जर आपण हे सर्वांपर्यंत पोहोचवले तर नक्कीच हा प्रेरणादायी ठरेल. आणि तेव्हा मनात विचार आला की आपण हा नवोपक्रम लिहूया.

## उपक्रम करताना करावयाच्या कृतीचा क्रम

**१)सर्वेक्षण.**

स्थलांतरित होण्याचे ठिकाण हे मागील काही वर्षांपासून माहीत असल्यामुळे मी दरवर्षी तिथे शाळा भेटीला गेली असताना भेट देते व तिकडील सर्वे करते. इतर मुलांसाठी त्या झोपडपट्टीत भेट देताना निदर्शनास आली.

**२)पालक भेट**

स्थलांतरित मुलांनी दर्शनास आल्यानंतर पालक भेट करण्यात आली. मुलांच्या मागील शिक्षणाचा आढावा घेण्यात आला. शाळेत दाखल करण्यासाठी असणाऱ्या पुराव्या बद्दल चर्चा करण्यात आली. ते या तालुक्यात किती दिवस राहणार आहेत या संदर्भात ही माहिती देण्यात आली

**३)ठेकेदार किंवा झोपडपट्टीचे प्रमुखांशी चर्चा**

ठेकेदारांच्या भीतीने काही पालक मुलांना आपल्या सोबत कामालाही घेऊन जातात. किंवा काही पालकांची अशी अडचण असते की ते त्यांना झोपडीत एकटे ठेवून जाऊ शकत नाही अशावेळी ठेकेदारांशी बोलावे लागले.

तसेच इरफान व इकबाल ची आई ज्या बिल्डिंगचे वाचन चे काम करीत होते तर त्यांच्या प्रमुखांशीही बोलावे लागले अशा प्रकारे जिथे ते कुटुंब भाड्याने राहतात किंवा झोपडीत राहतात तिकडच्या प्रमुखांशीही बोलावे लागते. मुले शाळेत दाखल करण्यामध्ये ठेकेदारांची देखील मदत होते.

**४) शाळेतील मुख्याध्यापकांशी चर्चा**

स्थलांतरित मुलांना साखर करण्यासाठी सर्वच मुख्याध्यापक तयार होत नाही कारण मुलांच्या भरपूर अडचणी असतात व ती मुलं इतर मुलांना ही त्रास देतात किंवा ती मुलं काही दिवसांनी स्थलांतरित होतात तर अशावेळी मुख्याध्यापकांशी चर्चा करावी लागते मला सर्व मुलांच्या मुख्याध्यापकांशी सर्वप्रथम चर्चा करावी लागली व त्यांना मुलांची कौटुंबिक आर्थिक स्थिती समजून सांगावी लागली व ही मुलं या शाळेत राहणार आहेत स्थलांतरित होणार नाही ही खात्री पटवून देण्यात आली.

**५)वर्ग शिक्षकांशी चर्चा**

शाळेत दाखल केल्यानंतर मुलांचा संपर्क हा प्रत्यक्ष वर्ग शिक्षकांशी असतो त्यामुळे वर्ग शिक्षकांना त्यांची मागील शिक्षणाची माहिती देणे व त्यांच्या प्रगतीसाठी वयानरूप अध्यापन कशाप्रकारे करावे या संदर्भात चर्चा करावी लागली.

**६) शैक्षणिक साहित्य व इतर गरजांची पूर्तता**

मुलांचे अध्ययन प्रभावी होण्यासाठी त्यांचे शैक्षणिक गरजा पुरवणे हा एक या उपक्रमाचा टप्पा आहे मुलांना दप्तर वह्या पेन्सिल पेन व पावसाळा असला तर रेनकोट इतर साहित्य पुरवावे लागले. खाजगी अनुदानित शाळेत दाखल केलं तर गणवेश ही मुलगी पुरवावा द्यावा लागला.

**७) शाळा भेट व मुलांना अध्यापन**

या उपक्रमातील महत्त्वाची कृती म्हणजे मुलांना टिकवणे आणि मुलांना टिकवण्यासाठी सतत शाळेत भेट द्यावी लागली तसेच त्यांच्या अध्यापनासाठी शिक्षकांशी चर्चा करण्यात आली व मी स्वतःही त्यांना अध्यापन केले त्यांना अध्यापनात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी परत शिक्षकांची व मुख्याध्यापकांशी चर्चा करण्यात आली एकंदरीत त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व मुलांना टिकवण्यासाठी सतत भेट देण्यात आली

याला उपक्रम अंतर्गत ज्या ज्या मुलांना शाळेत दाखल केले त्या प्रत्येक मुलांच्या बाबतीत वरील सर्व कृती कराव्या लागल्या. कारण प्रत्येक मुलांची शाळा वेगळी होती प्रत्येक मुलांची झोपडपट्टी वेगळी होती आणि प्रत्येक मुलांची क्षमता आहे ती ही वेगळी होती त्यामुळे काहींच्या बाबतीत एखाद्या कृतीवर जास्त जोर द्यावे लागले.

तसेच काही मुलांच्या आधार कार्ड मध्ये तसेच जन्मतारखेमध्ये तफावत असते आणि पालकांचं म्हणणं म्हणण्यानुसार आधार कार्ड मध्ये शिक्षकांच्या मदतीने आधार कार्ड मध्ये बदल करावे लागतात. ज्यांचे आधारकार्ड नाही त्यांचे नविन आधारकार्ड शिक्षक बनविण्यास पालकांना सहाय्य करतात.अशाप्रकारे वरील उपक्रम राबवताना या कृती कराव्या लागल्या.

## उपक्रमासाठी इतरांची मदत

कोणतेही कार्यक्रम यशस्वी करताना प्रत्येकाच्या मदतीची गरज असते शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हे उपक्रम राबवताना मला बऱ्याच लोकांची मदत लाभले.

**१) लोकसभाग**

**मा**गील सात वर्ष मी शाळाबाह्यचा काम करीत आहे त्यामुळे माझ्या बरेच मित्र मैत्रिणींना तसेच ओळखीच्या व्यक्तींना या संदर्भात माहित आहे . शिक्षकांनाही माहित आहे . इरफान व इक्बाल हे जेव्हा स्थलांतरित होऊन शेटे नगरला आले तर एक सेवानिवृत्त शिक्षक यांनी मला फोन करून कळविले की मॅडम हमारे "यहा दो बच्चे स्कूल नही जाते है मैने बहुत

समजाया लेकिन वो नही समजते आपली ये काम अच्छी तरह कर सकते हो". त्यांच्यामुळे आज इकबाल इरफान शाळेत शिक्षण घेत आहे.

इरफान व इकबाल ला उर्दू माध्यमाच्या शाळेत जायचे होते आणि ती चार किलोमीटर शाळा लांब होती. खाजगी उर्दू शाळा होती. शेटे नगर मधून दररोज शाळेत मारुती व्हॅन मधून मुलं जात होती. इकबाल व इरफान ची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे व्हेन आईला पडवळत नव्हती व आईला काम सोडून शाळेत सोडायला जाणे शक्य नव्हते अशा वेळी ड्रायव्हरशी बोलल्यावर ते फ्री मध्ये मुलांना शाळेत सोडू लागले. अशाप्रकारे युसुफ मजगावकर यांची मदत मिळाली. इकबाल से सहलीचे पैसेही एका पालकांनी भरले. यास्मिन व भावंडाची माहिती माझ्या एका विद्यार्थ्याने मला दिली की त असे कुटुंब स्थलांतरित झाले आहे व ते कुठेही शाळेत जात नाही.

**२) अधिकारी व शिक्षकांकडून मिळालेली मदत**

आदरणीय दीपा सावंत मॅडम यांनी हा उपक्रम राबविताना मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी मिस्त्री प्रायमरी शाळेतील मुलांना गणवेश दिला तसेच शगुप्ता मॅडम ए.डी नाईक हायस्कूल यांनी माझ्या व्हाट्सअप स्टेटसला प्रसिद्ध देऊनशाळेच्या यांनीही विद्यार्थ्यांना गणवेश दिला विभा बाणे मॅडम तसेच नाजनीन मिरकर यांनी मुलींना अभ्यासासाठी सोलार कंदील दिला. श्रीमती ढेरे मॅडम यांनी मुलांना वह्या दिल्या. श्रीमती नागवेकर मॅडम ओके देसाई स्कूलच्या क्लार्क यांनी मुलांना रेनकोट व दप्तर दिला.

३) चाईल्ड लाईनच्या अन्वी मॅडम व त्यांच्या टीमची मदत

मागील काय मागील बरेच वर्ष मला माझ्या या कामासाठी चाईल्ड लाईनची मदत लागते या उपक्रमांतर्गत ही मला चाइल्ड लाईनच्या आदरणीय अन्वी शिंदे मॅडम व त्यांच्या टीमची मदत मिळाली.

४) सहकाऱ्यांची मदत

मुलांची उंच भरारी या उपक्रम राबवताना माझ्या कार्यालयीन सहकाऱ्यांची मदत लागली

## संबंधित व्यक्तींशी व तज्ञांशी चर्चा

आदरणीय दिपा सावंत मॅडम अधिव्याख्याता डायट तसेच समता कक्षाचे प्रमुख आदरणीय डॉक्टर संदीप पवार सर हे नेहमीच माझे बालरक्षक असे काम पाहून मला लिहिण्यासाठी प्रोत्साहित करत असत. कामाच्या ओघात मी लिहिण्याचा नेहमीच कंटाळा करीत. यावेळी मी आदरणीय दिपा सावंत मॅडम ना माझ्या कल्पने संदर्भात सांगितले तर त्यांनी मला या नवोपक्रम साठी मार्गदर्शन केलं.

2022 23 मध्ये मी एकूण बारा मुलांना शाळेत दाखल केले होते पण त्यातील चार मुलं स्थलांतरित झाली आठ मुलं आजतागायत शाळेत दाखल आहेत त्याचप्रमाणे यावर्षी 2023 24 या शैक्षणिक वर्षात मी नऊ मुलांना शाळेत दाखल केले होते त्यातील सहा मुलं शाळेच्या प्रवाहात आहेत.

## उपक्रमासाठी सादर **करावयाचे** पुरावे

| अ क्र | मुलाचे नाव | दाखल केल्याचा दिनांक | दाखल केलेली इयत्ता | दाखल केलेल्या शाळेचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | गजेंद्र हरेंद्र पाल | 13/09/2022 | 5 वी | अ के देसाई हायस्कूल रत्नागिरी | माहे डिसेंबर 2023 शाळेत शिकत आहेत |
| २ | सुरज हरेंद्र पाल | 13/09/2022 | 7 वी | अ के देसाई हायस्कूल रत्नागिरी | माहे डिसेंबर 2023 शाळेत शिकत आहेत |
| ३ | संगीता नरेंद्र पाल | 13/09/2022 | 6 वी | अ के देसाई हायस्कूल रत्नागिरी | माहे डिसेंबर 2023 शाळेत शिकत आहेत |
| ४ | इकबाल दस्तगीर शेख | 13/09/2022 | 3 री | इस्माईल हकीम उर्दू प्रायमरी स्कूल रत्नागिरी | अदयापही शाळेत मुले शिकत आहेत. |
| ५ | इरफान दस्तगीर शेख | 13/09/2022 | 4 थी | इस्माईल हकीम उर्दू प्रायमरी स्कूल रत्नागिरी | अदयापही शाळेत मुले शिकत आहेत. |
| ६ | आसिफ मेहबूब अगस्मानी | 29/08/2022 | 9 वी | मिस्त्री हायस्कूल रत्नागिरी | 2021 मध्ये करोना काळात दाखल केले होते नंतर कर्नाटकला परत गेले व 2022 मध्ये ऑगस्टमध्ये आल्यावर त्यांना शाळेत दाखल केले सध्या 2023 24 मध्ये दहावीत दुसऱ्या स्कूलचे शिकत आहे |
| ७ | आयान मेहबूब अगस्मानी | 29/08/2022 | 4 वी | मिस्त्री प्रायमरी | 2021 मध्ये करोना काळात दाखल केले होते नंतर कर्नाटकला परत गेले व 2022 मध्ये ऑगस्टमध्ये आल्यावर त्यांना शाळेत दाखल केले सध्या कर्नाटक मध्ये शिकत आहे पालकांशी बोलणे झाले |
| ८ | जोया शब्बीर वस्ताद | 20/6/2022 | 3 वी | नगरपरिषद क्रमांक 10 | घर बदलल्याने मिस्त्री हायस्कूल येथे शिकत आहे |
| ९ | मेहेक अंजुम शब्बीर | | 6 वी | नगरपरिषद क्रमांक 10 | घर बदलल्याने मिस्त्री हायस्कूल येथे शिकत आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वस्ताद | 20/6/2022 | | | |
| १० | उमेमा मोहम्मद वस्ता | 26/11/2022 | 2 वी | नगरपरिषद शाळा क्रमांक 10 | त्या शाळेत आजतागायत शिकत आहे |
| ११ | तहसीना अफजल शाह | 22/7/2022 | 3 वी | नगरपरिषद शाळा 22 | नगरपरिषद शाळा क्रमांक 22 मध्ये दाखल केले होते परंतु मध्ये रस्ता क्रॉस करावा लागत असल्याने यावर्षी मराठी माध्यमच्या जवळच्या शाळेत नगरपरिषद क्रमांक 21 मध्ये दाखल केले आहे व तिथे ते आजतागायत शिकत आहेत |
| १२ | शिफा अफजल शा | 22/7/2022 | 2 वी | नगरपरिषद शाळा 22 | नगरपरिषद शाळा क्रमांक 22 मध्ये दाखल केले होते परंतु मध्ये रस्ता क्रॉस करावा लागत असल्याने यावर्षी मराठी माध्यमच्या जवळच्या शाळेत नगरपरिषद क्रमांक 21 मध्ये दाखल केले आहे व तिथे ते आजतागायत शिकत आहेत |

2022-23 या शैक्षणिक वर्षात 15 पेक्षा जास्त स्थलांतरित अथवा शाळाबाह्य मुलं दाखल केले परंतु इतर मुलं स्थलांतरित झाली व वरील मुलं अद्यापही शाळेत शिकत आहेत त्यात मी स्वतः दाखल न केलेला रेहान अहमद चंदूबाबू ज्याला नियमित ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले . यासाठी चाइल्ड ची मदत घ्यावी लागली कारण हा बाल मजूर म्हणून काम करत होता. मामाने त्याला कामासाठी रत्नागिरी मिरकरवाडा येथे आणले होते सध्या तो इथेच आहे पण शाळेत येत आहे.
तसेच नेपालहून आलेल्या थापा मुलालाही शाळेत हंगामी स्वरूपात दाखल केलं व रोज शाळा येण्यासाठी बरेच प्रयत्न केले तो नारायण माळी नाचणे नंबर 3 शाळेत शिकत आहे.

शाळाबाह्य मुलांची उंच भरारी या उपक्रमात फक्त 2022-23 मध्ये दाखल झालेल्या मुलांना शाळेत टिकवण्यासाठी काम केले नाही तर या उपक्रमा अंतर्गत मागील सहा वर्षाच्या मुलांना दाखल केले आहे त्यात खालील माझ्या मुली आहेत त्यांच्यासाठी ही मी या उपक्रमांतर्गत काम केले आहे.

१) मावशी बरोबर फुल विकणारी सोना कुमारी नाचणे नंबर एक शाळेत दाखल आहे
२) शेवंती मेघेरी नाचणे नंबर एक मध्ये शिकत आहे
३) मुस्कान शेख व तिचे दोन्ही भावंडा मिस्त्री हायस्कूल येथे शिकत आहेत


४) इक्रा  बनेटीही मिस्त्री हायस्कूल येथे शिकत आहे.

**2023-24 मध्ये दाखल केलेली मुलं**
१) अल्मासी अलवार.. मिस्त्री प्रायमरी
२) अल्फिया एलवार.... मिस्त्री प्रायमरी
३) सुहाना हिप्परगी.  मिस्त्री हायस्कूल
4) अब्दुल रहमान हिप्परगी  मिस्त्री हायस्कूल
5) तसलीम नवी शेख नगरपरिषद क्रमांक 22

**माहितीचे विश्लेषण आलेख तक्ते**


स्थलांतरित व शाळाबाह्य मुलांना दाखल करण्याचे काम मी  मागील सहा सात वर्ष आधीपासून करत आहे. काही मुलं छोट्या कालावधीसाठी आई-वडिलांच्या सोबत स्थलांतरित व्हायचे त्यांचे काम पूर्ण झाले की ते दुसऱ्या ठिकाणी जायचे. अशा मुलांना हंगामी स्वरूपात दाखल केले. त्या संदर्भात त्या त्या वेळच्या शिक्षणाधिकारी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. ज्या शाळेत मुलं दाखल होत होती त्या शाळेत शिक्षकांना हंगामी रजिस्टर करण्यास सांगितले. ते जात असताना शिक्षण हमी कार्ड त्या कालावधीचा देण्यासंदर्भात  ही मार्गदर्शन केले होते.मागील काही वर्षात पाहिले तर अनुभवाच्या आधारावर दरवर्षी जास्तीत जास्त मुलांना टिकवण्याचा प्रयत्न करेन मागील वर्षाच्या तुलनेने या दोन वर्षात **शाळाबाह्य मुलांची उंच भरारी** या उपक्रमांतर्गतस्थलांतरित दाखल केलेली मुलं शाळेत टिकली व शिकत आहे.

| | १८-१९ | १९-२० | २०-२१ | २२-२३ |
|---|---|---|---|---|
| दाखल केलेल्या मुलांची संख्या | १४ | १५ | १८ | १२ |
| स्थलांतरित झाल्यामुळे दाखल केलेल्या मुलांपैकी शाळेत टिकलेल्या मुलांची संख्या | ७ | ९ | १३ | १२ |




2022 ते 20 या शैक्षणिक वर्षात साधारणता सप्टेंबर पर्यंत मुलांना शाळेत दाखल केले. त्यांच्या प्रगतीचा आलेख खालील प्रमाणे पाहूया

| | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती | ३०% | ३५% | ५०% | 61% |
| इतर क्षेत्रात परिस्थिती | ३५% | ५०% | ५५% | ६५% |




वरील विद्यार्थ्यांची इतर क्षेत्रातील प्रगती म्हणजे शारीरिक शिक्षणामध्ये मुलांनी भाग घेतला. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ही मुलं भाग घेताना दिसले तसेच त्यांच्या वर्तनात ही मुलांच्या बद्दल आलेला दिसला. एका शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व मध्ये बदल होते हे वरील वरील आलेखामध्ये दिसून येते दिसून येते. हीच **शाळाबाह्य मुलांची उंच भरारी** आहे असं म्हणता येईल.

## बिर्याणी वाला रिहान शाळेत नियमित :

बिहार मधून रेहान अहमद चांद बाबू आपल्या मामा बरोबर रत्नागिरी स्थलांतरित झाला मामा ने बिर्याणी बनवण्याच्या कामास मदतीसाठी त्याला घेऊन आल होता. तो स्वतःही एकटा बिर्याणी बनवून विकतो जेव्हा मामा गावाला जात असे. मी जेव्हा शाळा भेटीला गेले तेव्हा मला तो निदर्शनास आला कारण शाळेसमोर असते दुकान आहे आणि तो लहान मुलगा काम करताना दिसला. मी शाळात विचारलं तर शाळेच्या बाई म्हणाल्या की व स्कूल मे दाखल हे परंतु तो शाळेत येत नव्हता तेव्हा त्याच्या मामाला व त्याला समजावून सांगितले काही दिवस शाळेत आला माझ्या दोन महिन्यांच्या भेटीनंतर परत शिक्षकांनी हे सांगितले त्यामुळे शेवटी मला चाईल्ड लाईनची मदत घ्यावी लागली आदरणीय अन्वी शिंदे मॅडम आपल्या टीमच्या मेंबर ना बोलावलं आम्ही त्याच्या मामाची समजूत घातली तसेच त्याच्या पालकांनाही सांगितले की हा शाळेत न जाता फक्त बिर्याणीचे काम करत आहोत पालकांशी तासभर फोनवर बोलणं झालं . रेहान ची आई बिहारला परत बोलण्यास तयार झाली पण ती म्हणत होती इथे येऊन ही तो तसाच राहतो म्हणून मी तिथे

दोन्ही कामांसाठी पाठवले तो बिर्याणीचा कामही शिकत तसेच शाळेतील जाईल. रेहानच्या भवितव्याचा विचार करून त्याच्या मामाची समजून घालून दिली तो नियमित शाळेत येऊ लागला व मामाला ही संध्याकाळी मदत करतो. अशाप्रकारे रेहानने घेतली उंच भरारी.



नगरपरिषद क्रमांक 22 शाळेसमोर बिर्याणीच्या काम करणाऱ्या रेहान व त्याच्या मालकाचे समुपदेशन करताना

## पाल कुटुंबांची माहिती

दिनांक 13 सप्टेंबर 2022 रोजी जेव्हा दोन मुलांच्या संदर्भात शेटे नगर ला भेट दिली तेव्हा पालकांची वाट पाहताना मला शेजारी अजून काही मुलं खेळत निदर्शनास आले मी लगेच हाक मारल्यावर विचारलं तुम्ही शाळेत गेलात नाही का तर मला हिंदी मध्ये उत्तर आलं "हम स्कूल नही जाते"त्यांचे हे बोलणं ऐकून मी त्यांच्याकडे गेले व विचारल्यावर त्या मुलांनी सांगितलं आम्हाला इथे येऊन दोन महिने झाले. याआधीही आम्ही कोरोना काळात काही महिने इथे होतो असे मुलांनी सांगितले. माझे बाबा इथे मुलांचा खाऊ घेऊन फिरत विकतात. त्यावेळी ते आपल्या आत्याच्या घरी खेळत होते मी व तिथे जवळच राहणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षिका परमारे मॅडम माझ्यासोबत आल्या. मी त्यांच्या आईची चर्चा केली . त्यांची माहिती घेतली व पालकांचा नंबर त्यांना माहीत नसल्यास मी माझा नंबर तिथे देऊन आले संध्याकाळी पालकांचे फोन आले व ते उत्सुकतेने म्हणाले की मला माझ्या मुलांना शाळेत दाखल करायचा आहे. मी दोन शाळेत गेलेलो पण जवळच्या दोन इंग्लिश मीडियम शाळा असल्यामुळे मला प्रतिसाद मिळाला नाही. मी स्वतःही माझ्या मुलांना शाळेत घालण्यास इच्छुक आहे त्यांचे हे शब्द आता मला आनंद झाला. मी दुसऱ्या दिवशी त्यांना ओके देसाई शाळेत जाण्या संदर्भात सूचना दिल्या. दिनांक 14 सप्टेंबर रोजी सकाळपासून नरेंद्र पाळ म्हणजे त्या मुलांचे पालक यांचे मला फोन येत होते "मॅडम आप भी आये तो बहुत अच्छा रहेगा."त्यावेळी माझा कार्यालयात महत्त्वाचा काम असल्यास मी त्यांना जाण्यास सांगितले

व मुख्याध्यापकांना फोन केला. पालक श्री नरेंद्र पाल सकाळी साडेनऊला तिथे जाऊन बसले. आधार कार्डवर चुकीची जन्मतारीख आहे असे ते सांगत होते.

मुख्याध्यापकांशी दूरध्वनी व चर्चा झाल्यावर मी त्यांना सध्या हंगामी स्वरूपात दाखल करण्यासंदर्भात सांगितले. दिनांक पंधरा सप्टेंबर रोजी परत पालकांचा सकाळी फोन" मॅडम अगर आप स्कूल आते तो बहुत अच्छा होता."मी त्यांना संध्याकाळची चारची वेळ दिली. मी जेव्हा चारला पंधरा मिनिटे कमी असताना शाळेत गेले तेव्हा तो आपला खाऊ लावलेली दांडा सोबत घेऊन शाळेच्या बाहेर उभा होता. . मी त्याला ओळखले मी त्याला हाक मारून शाळेत बोलवले पालकांची उत्सुकता पाहून समाधान झालं. सुरज नरेंद्र पाल, गजेंद्र नरेंद्र पाल, व संगीता नरेंद्र पाल या तिन्ही मुलांसंदर्भात मुख्याध्यापकांशी चर्चा करण्यात आली. जोपर्यंत त्यांच्या निश्चित जन्मतारखेचा शोध लागत नाही तोपर्यंत त्यांना हंगामी स्वरूपात दिनांक 15 सप्टेंबर 2022 रोजी दाखल करण्यात आले. श्रीमती नागवेकर लिपिक अ.के देसाई ते नेहमीच मला शाळाबाह्य मुलांसंदर्भात मदत करतात त्या दिवशीही आम्ही या मुलांना स्कूल बॅग देऊ असे सांगण्यात शाळेचे गणवेश ही शाळेकडून मिळणार असे मुख्याध्यापकांनी सांगितले हाय कोण खूप समाधान वाटले.त्यादिवशी त्यांना पुस्तक देण्यात आली शाळेतील सर्व शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे सहकार्य लाभले.



# ५)नवोपक्रमाची कार्यपद्धती

## पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी

**2022- 23.** या कालावधीत ज्या मुलांना दाखल केले. त्यांचे पालक अशिक्षित होते. त्याच्यातील फक्त एक मुलगी रत्नागिरी येथे राहणारी होती ती आजारी असल्यामुळे इयत्ता पहिली मध्ये तिला दाखल केले नव्हते व इतर विद्यार्थी स्थलांतरित होऊन रत्नागिरी येथे कामानिमित्त आले होते.

पाल कुटुंबातील प्रमुख हरेंद्र पाल हे लहान मुलांची मिठाई( गुड्डी के बाल) हे रत्नागिरीतच राहत होते त्यांनी त्यांचे कुटुंब **2022-23** जून मध्ये रत्नागिरी ते आणले होते त्याआधी कोरोना कालावधीत त्यांची मुलं शाळेत जात नव्हती त्यामुळे फक्त मोठ्या मुलाला हिंदी थोडं थोडं वाचता येत होते.

वरील प्रमाणे महेक अंजूम व जोया कर्नाटक मधून स्थलांतर झालेल्य आपल्या आजीकडे होत्या दोन वर्ष अंजूम करोना काळात शाळेत गेलेल्या नाही आणि **2022-23** च्या मे महिन्यात मला निदर्शनास आली जो या रत्नागिरीत आली होती तिला अंगणवाडी ती मी दाखल केले होते. त्याच्या आदल्या वर्षी काही दिवसांसाठी विचारल्यावर समजले की ते मार्चमध्येच इथे आल्या आहेत मार्चमध्ये त्यांनी शाळेत न घालण्याचे कारण की त्यांना उर्दू शाळेत घालायचं होतं आणि जवळ उर्दू शाळा नव्हती व त्याबाबत त्यांना कल्पनाही नव्हती. व्यवस्थित मार्गदर्शन केल्यानंतर पालक शाळेत घालण्यासाठी तयार झाले.

अशाच प्रकारे सर्वच मुलांना या संदर्भातील ज्ञान व शिक्षणाची जाणीव नसल्यामुळे व कोरोना काळातला प्रभाव ,घरी बसण्याची सवय मुलांमध्ये दिसून येत होती तसेच पालकांनाही त्याची जाण नव्हती. पालकांची कोरोनामध्ये आर्थिक स्थिती ढासाळली होती त्यामुळे ते आपल्या कामाच्या मागे होते असे एकंदरीत दिसण्यात आले.

अशा मुलांना शाळेत दाखल करताना शिक्षकांच्याही मनात निराशा होते कारण कोरोना कालावधीनंतर स्थलांतरित झालेल्या मुलांना काहीच येत नव्हते. त्यांना त्या मुलांचा सुरुवातीपासून अभ्यास घ्यायचा होता.

## कार्यवाही दरम्यान केलेल्या निरीक्षणे व माहिती संकलन

दिनांक पाच जुलै 2021 रोजी राष्ट्रीय स्तरावरून निपुण भारत हा महत्वकांक्षी मोहिमेचे उद्घाटन झाले आणि सर्व राज्यांच्या कानाकोपऱ्यात निपुण भारत हे गीत जाऊन पोहोचले

**निपुण भारत का सपना**

**सब बच्चे समजे भाषा और गनना**

बालरक्षक म्हणून वरील गीत माझ्याही लक्षात राहीले.

स्थलांतरित मुलांना शाळेत दाखल करून शांत बसून चालत नाही बोलती मूल दाखल झाल्यावर ते मुल तिथे रमणे टिकणे व त्यानंतर त्या मुलाला गुणवत्ता पूर्ण शिकवण शिक्षण मिळून त्याचा सर्वांगीण विकास होणे हे साध्य करणे ही बालरक्षकाची भूमिका असते त्याचप्रमाणे मीही ज्या मुलांना शाळेत दाखल करते त्या मुलांसाठी अविरत काम करते या उपक्रमात ही 2022-23 व 2023-24 या शैक्षणिक वर्षाच्या मुलांना शाळेत दाखल केले तर फक्त तिथेच न थांबता या उपक्रमांतर्गत मी त्या मुलांच्या प्रगतीसाठी कार्यालयीन कामातून वेळ काढून शाळा भेट करत असेल त्यांना अध्यापन करत होते तसेच पालकांशी शिक्षकांची सतत चर्चा करत होते.

इस्माईल हकीम उर्दू प्रायमरी शाळेत उत्तर प्रदेश इकबाल दस्तगीर शेख व इरफान दस्तगीर शेख या दोन्ही पैकी एक भाऊ इयत्ता पहिली मध्ये करोना काळात दाखल झालेला परंतु करोना काळात च्या आधीच ते गावी गेले व 2022 23 मध्ये ते शेटे नगर येथे आले माझ्या या कामाची प्रसिद्धी असल्यामुळे निवृत्त शिक्षिकेने मला फोन केला आणि सांगितलं मॅडम आमच्या शेजारी दोन मुलं राहायला आलेली आहेत तर ते मागील महिनाभर कुठे शाळेत दाखल नाही

त्यामुळे मी तिथे भेट देऊन व पालकांशी हितगुज करून त्यांना समजावून शाळेत दाखल केलं इकबाल चा आधी तिथे दाखला होता परंतु तो तीन वर्ष शाळेत न गेल्यामुळे त्याला ड्रॉप बॉक्समध्ये घातले होते सर्वात आणि त्यांना उर्दू शाळेतच दाखला घ्यायचा होता मोठी समस्या ही होती की त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता आईला पाच किलोमीटर जाऊन सोडणे शक्य नव्हते. तेव्हा मी आणि त्या निवृत्त शिक्षकांनी काहीतरी सोय तू असे विचार केलं आणि येणाऱ्या स्कूल बस मध्ये व्यवस्था करण्याचा विचार केला पहिला दिवशी त्या स्कूल बस मालकांशी बोलल्यावर ते तयार झाले व ते त्यांना नेण्यास नेत होते नंतर शाळेत गेल्यावर असे समजले की स्कूलबस ड्रायव्हर स्वतः फ्री मध्ये त्यांना सोडण्यास तयार होते सांगायचं तात्पर्य हे की जर आपण एक मदतीचा हात दिला तर समाजातील इतर लोक ही स्वतःहून अशा मुलांसाठी मदत करण्यास तयार होतात याप्रमाणे आजतागायत ही मुलं शाळेत जात आहेत तेवढीच गोष्ट नाही जेव्हा मी यांच्या आढाव्यासाठी अध्यापनासाठी शाळेत गेले तेव्हा कळलं की यांची सहल जात होती आणि त्या दोन्ही मुलांकडे पैसे नव्हते त्यामुळे त्या वर्गातील एका मुलाने आपल्या घरी जाऊन सांगितलं व त्यांच्या पालकांनी ही मुलंही सहलीला जाऊ दे म्हणून त्यांची सहलीची फीज भरली. आढाव्यामध्येही मुलांची अभ्यासाची प्रगती दिसून आली जी मुलं तीन वर्ष शाळेत गेली नाही त्यांना परत अ ब पासून शिकवण हे खूप कठीण असतं पण या सर्व शिक्षकांच्या मदतीने हे शक्य होत आहे त्यांना प्रोत्साहन करण्याचं काम व कधीतरी अध्यापन करण्याचा काम ही फक्त मी करते. इस्माईल हकीम शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती मोरीधा मॅडम ही शैक्षणिक साहित्यासाठी त्यांना सतत मदत करत असते.मरियम्मा व मरियम्मा ची शेवंती या दोघी बहिणींना मी कोरोनाच्या आधी दाखल केले होते पण करुणा कालावधीत त्या आपल्या गावाला होते तरीही या दोघींचे ऑनलाईन शिक्षण सुरू होते तेही मर्यामाने मला फोन करून शेजारील व्यक्तीचा नंबर दिला आणि सांगितलं की मॅडम यांच्या व्हाट्सअप वर मला माहिती पाठवत रहा.... मी तिलाही सांगितले आता शाळा सुरू झाल्या आहेत तू कर्नाटक मध्ये शाळेत दाखला घे. आम्ही या शाळेतून तुझी माहिती पाठवते परंतु तिने तिथे कोणत्याही शाळेत दाखल झाली नाही ती म्हणाली मॅडम मला परत रत्नागिरीत यायचं आहे आणि 2021 22 च्या जानेवारी महिन्यात ती रत्नागिरीत आली तिचे मला सतत फोन तेव्हा मी तिला शाळेत दाखल केलं काही दिवस शाळा कोरोना प्रादुर्भाव वाढल्याने बंद होत्या तेव्हा मी तिला रोटरी क्लब तर्फे मोबाईल मिळवून दिला.

2022 ते 2023 24 मध्ये त्याच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न सुरू होते कधीही शाळेत न गेलेली इयत्ता तिसरी मध्ये दाखल केलेली मरियम्मा सध्या शिक्षकांच्याही प्रयत्नामुळे आज इयत्ता आठवी मध्ये जांभेकर विदयालय येथे शिकत आहे.

मरियम आहे एमआयडीसी भागात राहते व तेथील सर्व मुलांना रस्ता क्रॉस करण्यासाठी समस्या असायची त्यामुळे पालकांना सोडण्यात यावे लागत त्या कारणांसाठी मुलांमध्ये शाळेत येण्यासाठी नियमितपणा नव्हता. सहावी सातवी या दोन वर्षात मरियम्मा सर्व मुलांना घेऊन रस्ता क्रॉस करायचे त्या वाटेतच डायट कार्यालय असल्यामुळे डायट चे सर्व अधिव्याख्याता त्याच्या या कामासाठी नेहमीच प्रशंसा करत असत. मरियमा ही इयत्ता आठवी ओके देसाई हायस्कूल या दुसऱ्या शाळेत शिकत असल्यामुळे सध्या तिची बहिण शेवंती सर्व मुलांना जि प शाळा नाचणे नंबर एक शाळेत आणते.

## ३)उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेल्या निरीक्षण व त्यांच्या नोंदी

मागील काही वर्षे जेव्हापासून मी मुलांना शाळेत दाखल करीत आहे तर फक्त दाखल करूनच तिथे थांबत नाही तर त्या मुलांच्या अडचणी काय आहेत हे पालक शिक्षक व विद्यार्थ्यांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करते. त्याचप्रमाणे या उपक्रमा करतानाही मी दाखल केलेल्या मुलांसंदर्भात ज्या अडचणी होत्या त्या जाणून गेल्या खालील प्रमाणे मुलांच्या अडचणी समजल्या

### १)शैक्षणिक साहित्य.

मुलांना शाळेत दाखल करताना सर्वप्रथम अडचण असायची वही पुस्तक स्कूल बॅग चप्पल पेन वॉटर बॉटल इत्यादी मी अशा प्रकारची मदत फक्त शाळाबाह्य दाखल केलेल्या मुलांनाच नाही तर इतर गरजू मुलांनाही करत असत तर या सर्व मुलांना मला स्वतः देणे शक्य होत नाही त्यामुळे मी नवीन उपक्रम सुरू केला तो म्हणजे व्हाट्सअप द्वारे गरजू मुलांना मदत मी ज्या मुलांना शाळेत दाखल करत होते अशा मुलांचे व्हाट्सअप ला फोटो ठेवत त्यामुळे माझ्या सर्व मित्र परिवारांना व नातेवाईकांना माहीत होते की मी अशा मुलांसाठी काम करते ते मला कधीतरी विचारत अशा मुलांना मदत लागली तर सांगावे तर अशा संदर्भात मी विद्यार्थ्यांचा फोटो न ठेवता पोस्ट तयार करायची की अशा आहे त्याची त्यांना गरज आहे आपल्या शक्य असेल तर मला किंवा शाळेतील शिक्षकांना संपर्क साधावा व स्वतः वस्तू विद्यार्थ्यांना नेऊन द्यावी. या स्वरूपातून मुलांना विविध प्रकारच्या वस्तू प्राप्त होत आणि मुलांनाही आनंद होत. एक मोठं उदाहरण म्हणजे करोना कालावधीत शाळाबाह्य दाखल

केलेल्या मुलांना मी रोटरी क्लब तर्फे मोबाईल मिळवून दिला. मरीअम्माचा उल्लेख इथे करावा असं वाटतं की ही एका झोपडीत राहते. तिथे लाईट ही नाही पण अभ्यासात हुशार मुलगी सध्या ती इयत्ता आठवी मध्ये शिकत आहे तिला इयत्ता तिसरी मध्ये दाखल केले होते तेव्हा ती कधीही शाळेत गेली नव्हती त्या मोबाईलच्या साह्याने ती आज आठवीपर्यंत पोहोचली आहे.

अशाच प्रकारे यावर्षीही दाखल केलेल्या शाळाबाह्य मुलांना विविध प्रकारचे साहित्य मिळवून दिले . काही मुलांना गणवेशी द्यावे लागले कारण उर्दू माध्यमाची जवळची शाळा म्हणजे खाजगी होती आणि खाजगी शाळेत युनिफॉर्म दिले जात नाही त्यामुळे तीन मुलांना गणवेश मिळवून  दिले त्यात माझ्या अशा काही मागे चार वर्ष दाखल केलेले आधीच्या मुलांनाही मी यावर्षी गणवेश मिळून दिला. तसेच या उपक्रमामध्ये मी ज्या झोपडीत लाईट नाहीये त्या मुलांना सोलर कंदील मिळवून दिला. त्याचा बऱ्याच मुलांना उपयोग झाला अशा प्रकारचे बरेच कंदील त्या वस्तीतून मागणी आल्यावर देण्यात आले.

**२) पालकांची संपर्क**

मुलांना शाळेत दाखल केल्यानंतर पालकांशी संपर्क बंद होत नाही तरी मुलांना काही शाळेत समस्या आले तर ते मुख्याध्यापकांना फोन न करता मला फोन करत की मॅडम मॅडम शेवंतीकडे रेनकोट नाही आहे तर काय करावे तर माझ्या त्या व्हाट्सअप पद्धतीने मी त्यांना रेनकोट मिळवून रेनकोट दप्तर अशा विविध शैक्षणिक साहित्य त्यांना मिळवून दिल त्यांना वह्या मिळवून पालकांशी चर्चा करता पालखी मुलांच्या अभ्यासा संदर्भात जागरूक दिसून आले. अभ्यासा संदर्भात ही काही अडचणी असले की पालक माझ्याशी संपर्क साधतात. परत गावाला जायची वेळ आली तर परवानगी शिवाय जात नाही एवढी जवळीक पालकांशी निर्माण झाली आहे कारण त्यांना माहित आहे परत गावाला गेल्यावर मॅडम दाखल करून घेणार नाही त्यामुळे पालकांमध्येही भीती तयार झाली व जास्त दिवस गावाला जात नाही काही वेळ अडचण असली की नातेवाईकांकडे मुलांची व्यवस्था करून जातात.

३)  शिक्षकांशी  चर्चा.

कोरोना काला नंतर निपुण भारत च्या आगमना सोबत विविध उपक्रमांना सुरुवात झाली त्यामुळे कार्यालयीन कामात व्यस्त झाले त्याच्यात ही त्या मुलांच्या पालकांना व शिक्षकांना फोन करून त्यांच्या प्रगतीचा आढावा घेत असे शाळा भेटी करून सध्या त्यांची प्रगती कुठपर्यंत आहे इंग्रजीमध्ये गणितामध्ये  मुल  कुठे  आहे हे काम केले त्यामुळे

शिक्षकांनाही आनंद होतो की फक्तच मुलं दाखल करून बालरक्षकांची जबाबदारी इथे थांबत नाही तर ते स्वतः अध्यापन करण्यास येतात. सुट्टीच्या दिवशी वेळ मिळाल्यास त्यांच्या झोपडीला भेट देऊन ही अध्यापन केले आहे.

**४) शाळा व्यवस्थापन समिती.**

बालरक्षक ची भूमिका बजावत असताना किंवा या स्थलांतरित मुलांना उंच भरारी घेण्यासाठी प्रोत्साहित करताना शाळा व्यवस्थापनाची ही भूमिका आहे फक्त मी त्या मुलांना दाखलच करत नाही तसेच बरेच शाळांमध्ये काही मुलं अनियमित असतात किंवा बरेच दिवस शाळेत येत नाही तर त्यांची कारण शोधून त्यांना शाळेत आणण्यासाठी मला शाळा व्यवस्थापनाची ही गरज लागते आणि अशावेळी नेहमी शाळा व्यवस्थापनाचा मदतीचा हात सोबत असतो. अशा अनियमित असणाऱ्या मुलांसाठी स्वतः शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मला फोन करून किंवा माझ्या भेटीदरम्यान चर्चा करून समस्या सोडविण्यासाठी सांगतात.

**5) चाईल्ड लाईनची मदत**

मागील पाच वर्ष माझ्या या कामांमध्ये चाईल्ड लाईनची खूप मदत मिळते. रत्नागिरी तालुक्यात जिल्ह्याच्या चाईल्ड लाईन समन्वयक श्रीमती अन्वी शिंदे यांनी स्वतः व त्यांच्या कार्यक्षेत्रातील टीम मधील या कामासाठी माझ्यासोबत पाठवले आहे मिरकर वाडा उर्दू मधील बिर्याणी चे काम करणारा मागील वर्षी दाखल झालेला..... या मुलाला मामा कामाला लावत होता व तो शाळेत येत नव्हता यासाठी मला चाईडलाईन टीम शिकून मदत लागली अशा प्रकारे विविध लोकांची ही या कामासाठी मदत घ्यावी लागली मिरकळवाडा शाळेतील मुलाने ही बिर्याणीचा काम करता करता शिक्षणामध्ये उंच भरारी घेतली आहे.

**उपक्रम राबवताना आलेल्या अडचणी.**

**स्थ**लांतरित मुलांना किंवा शाळाबाह्य मुलांना शाळेच्या प्रवासाने सोपे आहे पण तिथे टिकवणे ही **महत्त्वाची बाब आहे . यासाठी** खूप प्रयत्न करावे लागतात. प्रशिक्षक पालकांना समजावणे शैक्षणिक साहित्य देणे ऐकत नसल्यास चाईल्ड लाईनची मदत घेणे. त्या मुलांना अध्यापन करण्यासाठी वेळ देणे सतत त्यांचा आढावा घेणे. बरीच वर्ष शाळा भैय्या असल्यामुळे इतर मुलांची त्यांचा व्यवहार कसा आहे त्याच्या तक्रारी येतात त्या सोडविणे अशा भरपूर अडचणींना सामोरे जावे लागतात आणि मलाही हे उपक्रम राबवताना मागील वर्षा प्रमाणे अशा अडचणींना सामोरे जावे लागले.

**१) मुलांना शाळेत पाठवण्यासाठी पालकांना तयार करताना येणाऱ्या अडचणी.**

कोणत्याही चांगलं काम करताना अडचणी येतातच. मागील सहा वर्ष बालरक्षक म्हणून काम करताना झोपडपट्टीच्या ठिकाणी तर खूपच अडचणी आल्या. अशावेळी सुरक्षेची गरज असते. परंतु मी कोणत्याही सुरक्षेचा विचार न करता सहा वर्ष झोपडपट्टीच्या ठिकाणी जाऊन काम करीत आहे ट्रक मधून मुलांना कामाला जाताना जेव्हा थांबवले आहे तेव्हाही ठेकेदारांचा वर्तन असं होतं की सोबत पोलीस सुरक्षेची गरज भासली. कारण त्यावेळी सकाळची वेळ होती लोकही आपापल्या घरात होते ट्रक निघण्याची वेळ सकाळी सात वाजता असते तेव्हा लोक नसतात. मुलांना ट्रकमध्ये भरून कामाच्या ठिकाणी ठेकेदार घेऊन जात असतो.. मुलांनाही काम केल्याचे पैसे मिळतात तेव्हा त्यांनाही शिक्षणाचे महत्त्व नसते. अशा प्रकारच्या विविध अडचणी उपक्रम राबवताना आल्या.

**2) स्थलांतरित मुलांना शैक्षणिक साहित्य देणे व इतर शै. गरजा पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या अडचणी**

शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हे उपक्रम राबवतानाही मला मुलांना शैक्षणिक साहित्य देताना अडचणी आल्या पर्यंत प्रत्येक अडचणीतून मार्ग काढण्याचा मी प्रयत्न केला जसे मी काही दानशूर व्यक्ती शोधले आणि त्यांच्याद्वारे मुलांना शैक्षणिक साहित्य व युनिफॉर्म मिळवून दिला. सुहाना अल्फीया मरिअम्मा शेवंती यांच्या घरी लाईट नाही त्यामुळे त्यांना संध्याकाळी अभ्यास करताना खूप त्रास व्हायचा त्यांच्या झोपडीत ते दिवा घेऊन अभ्यास करायचे त्यामुळे शाळेतील शिक्षक तसेच माझ्या नातेवाईकांकडून व मी स्वतः सोलार कंदील विकत घेऊन अशा मुलांना दिले त्यामुळे त्यांना अभ्यास करताना येणाऱ्या अडचणीतून सुटका झाली व मुलांची प्रक्रिया सुरळीत पालकांनीही आनंद व समाधान व्यक्त केले.झोपडीत लाईट नसल्य. डॉलर शोधता नाही अडचणी येतात. शाळेत मुलांना फक्त शाळेत दाखल करून चालत नाही तर त्यांच्या सोयी सुविधांचा विचार करावा लागतो. जर त्यांच्या मागण्यांचा विचार केला नाही तर मुलं शाळेत येण्यास निराश असतात. अशावेळी मदतीचे हात शोधून त्यांना स्वतः विद्यार्थ्यांपर्यंत पोचून मदत करण्यास सांगितले.

**3)व्यसनी पालक च्या सामोरे जाताना येणाऱ्या अडचणी.**

पालक व शिक्षित असल्यामुळे त्यांना समजावणे ही कधीकधी खूप कठीण जाते त्यांचे विचार बदलणे हे सोपं काम नसतं अशा अडचणीला सामोरे जाऊन त्यांच्यामध्ये बदल आणणे म्हणजेच यशाचा पुरस्कार मिळाल्यासारखा होता.. काही पालक तर व्यसनी असतात.

त्यामुळे कोणत्याही वेळेत कधीही रात्री फोन करत असतात. अशा पालकांचे समुपदेशन करताना खूप अडचण येते. पालक शिक्षित नसल्यामुळे कधीही काहीही बोलतात तेही ऐकून घेण्याची तयारी ठेवावी लागली तसेच काही पालक साधे असल्यामुळे कोणत्याही वेळेस कधीही छोट्या छोट्या गोष्टी त्यासाठी फोन करत असतात त्याचीही तयारी मला ठेवावी लागली अशा प्रकारे शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हे उपक्रम राबवताना मला बऱ्याचशा अडचणींना सामोरे जावे लागले तरीही त्याच्यातून मी मार्ग काढून त्या मुलांच्या प्रगतीसाठी अद्यापही प्रयत्न करीत आहेत.

**४)भाषेची अडचण**

स्थलांतरित झालेले विद्यार्थी हे बहु भाषिक असतात त्यामुळे त्यांना इकडची मराठी भाषा शिकवणे हे शिक्षकांसाठीही व माझ्यासाठी ही अडचण निर्माण होते त्यामुळे त्यांच्यात प्रगती हळूहळू दिसून येते

उपक्रम राबवताना कन्नड भाषेच्या विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा करताना भाषेची अडचण येते. तसेच या मुलांना शाळे पालकांबरोबर या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात फिरण्याची सवय असते तर अशा मुलांना समजावणे प्रोत्साहित करणे व शाळेच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रेरणा देणे ही एक मोठी अडचण होती. पालकांशी व मुलांची चर्चा करतानाही त्यांची भाषा कळत नाही व ते आपल्या भाषे त काहीतरी चर्चा करतात पती आम्हाला कळत नाही आणि खोटंही बोलतात हे सर्वात मोठी अडचण असते

**5)अध्ययन निष्पत्ती प्राप्तीमध्ये येणाऱ्या अडचणी**

शाळाबाह्य मुलांना शाळेत वयानुरूप दाखल करावे लागते व त्याचप्रमाणे त्या इत्तेचा अध्यापन करावा लागते. या उपक्रमामध्ये ही मला मुलांना वयान रूप दाखल करावे लागले मुलांना त्याच्या इयत्तेचे अध्ययन निष्पत्ती प्रार्थना होत्या मध्ये काहीसा तीन वर्ष तर त्यांच्या दोन वर्ष गॅप असल्यामुळे त्यांना सुरुवातीपासून शिकवणे ही सर्वप्रथम मोठी अडचण होती. यासाठी स्वतःही अध्यापन केले व शिक्षकांना वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहित केले.

## नवपक्रमाची यशस्विता फलनिष्पत्ती

शासन परिपत्रक 9 जानेवारी 2017 मध्ये नमूद केल्यानुसार जी मुलं शिक्षणाच्या प्रवाहा बाहेर आहेत त्यांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत दाखल करून नियमितपणे शिकते करण्यासाठी शासन व्यवस्थेतील झपाट्याने काम करणाऱ्या शासन यंत्रणेतील व्यक्ती त्यामध्ये शिक्षक पर्यवेक्षक यंत्रणा अधिकारी यांचा समावेश होता. मी साधन व्यक्ती म्हणून श्रीमती खालिदा जुबेर जमादार ही प्रवेश पर्यवेक्षिका यंत्रणे मध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे बालरक्षक म्हणून मी शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हा उपक्रम करताना मला समाधान झाले मी ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण झाले व पुढेही त्याच्यासाठी प्रयत्नशील असणार आहे कारण हा उपक्रमाचा आहे हे जोपर्यंत मुलं प्रगतीपथावर पोहोचत नाही तोपर्यंत संपत नाही. 2020 नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. या उपक्रमाद्वारे मी हे काम केल्यावर मला समाधान झाले व या उपक्रमाची फलनिष्पत्ती झाली असे मला वाटते. या उपक्रमांतर अंतर्गत जी मुलं आहेत. नियमित झाली असती की नाही याच्यात अनिश्चितता होते परंतु जर आपण अशा प्रकारचे उपक्रम राबवले तर आपल्याला फलनिष्पत्ती प्राप्त होते. आसिफ या मुलाला 2022 23 मध्ये रत्नागिरीत परत स्थलांतरित झाल्यामुळे त्याला दाखल केले होते तो 2023 24 ला सुरुवातीचे तीन महिने नव्हता त्याच्यासाठी ही प्रयत्न करून त्याला बोलावून घेतले कारण तो इयत्ता दहावी मध्ये आता शिकत आहे कर्नाटक मधून येऊन त्याला तीन महिने झाले आहे व इयत्ता दहावी मध्ये त्याच्यामध्ये आधीच्या तुलनेत प्रगती दिसून आली.

1) शाळाबाह्य मुलांची उंच भरारी हे उपक्रम राबविल्याने असे लक्षात आले की मुलं फक्त शाळेतच दाखल झाली नाही तर ती शाळेत टिकली ही व नियमितपणे शाळेत येत आहेत

2) मुलांच्या वर्तणुकीत सुधारणा झालेल्या दिसतात तसेच त्यांचे विविष्ठ विविध दृष्टिकोनामध्येही बदल झाला आहे

3) या उपक्रमामुळे माझ्या स्वतःच्या भेटी व अध्यापन तसेच शिक्षकांच्या प्रयत्नामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ झाली आहे.

4) या उपक्रमानंतर शिक्षकांमध्ये असा विचार निर्माण झाला आहे की शाळाबाह्य मुलांना पर्यवेक्षीय यंत्रणा दाखल करून शांत बसत नाही तर त्याचा पाठपुरावा

करत असतात व त्यांना स्वतःहून अध्यापन करण्यासाठी ही आमच्या सोबत येतात. तसेच त्यांना व्हाट्सअप द्वारे शैक्षणिक साहित्याची ही मदत पुरवितात.या कामामुळे मलाही शिक्षकांमध्ये प्रसिद्धी मिळाली आहे यासंदर्भात जर एखाद्या विद्यार्थ्यांची समस्या असली तर मला त्या संदर्भात फोन येतात

5) व्हाट्सअप द्वारे विद्यार्थ्यांना मदत करणे हा माझा उपक्रम ही सर्वत्र प्रसिद्ध झाल्याने लोकांचे मला फोन येतात की जर असं कोणी विद्यार्थी असेल तर सांगा आम्ही मदत करायला तयार आहोत तसेच त्यांना कोणी विद्यार्थी आढळले तर त्या संदर्भात ही मला माहिती देतात.

**नवोपक्रमाचे (वेगळेपण)**

1. शाळाबाहय विदयार्थ्यांसंबंधित.

2. शाळाबाहय विदयार्थी शाळेत दाखल करुन ते टिकविण्यासाठी प्रयत्न.

3. विदयार्थ्यांना-शैक्षणिक साहित्य, गणवेश इ.

4. समाजातील विविध घटकांचे सहकार्य

5. या कामामध्ये मदतीचे हात वाढत गेले.

6. शाळेतील शिक्षक व विदयार्थ्यांचा मानसिकतेच बदल.

7. स्वांनद-समाधान.

# समारोप

रत्नागिरी तालुक्यातील स्थलांतरित मुलांसाठी राबवलेला उपक्रम शाळाबाह्य मुलांची उंच भरारी या शीर्षकाखाली छोटे विविध उपक्रम घेण्यात आले जसे व्हाट्सअप द्वारे शैक्षणिक साहित्याची मदत. विविध सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले स्थलांतरित मुलांना फक्त शाळेत त दाखल न करता त्यांना शाळेत टिकवून त्या मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एक प्रयत्न करण्यात आला या उपक्रमासाठी डायट प्राचार्य आदरणीय तावशीकर मॅडम तसेच अधिव्यक्तीचा आदरणीय दीपा सावंत मॅडम व रत्नागिरी तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी आदरणीय शिंदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) तथा जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ,रत्नागिरी**

**प्लॉट न.७० एम.आय.डी.सी. मिरजोळे, रत्नागिरी**

**दूरध्वनी क्र. : ०२३५२/२२८५७५** **E-Mail :dietrtn@gmail.com**

---

जा.क्र.निशिप्रसंर/आस्था/२०२३-२४/1201 दि. ०७/१२/२०२३

## अभिनंदन पत्र

**श्रीम. खालिदा जुबेर जमादार, विशेष साधन व्यक्ती** म्हणून पंचायत समिती शिक्षण विभाग रत्नागिरी बीआरसी रत्नागिरी येथे कार्यरत असून मागील सहा वर्ष शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करण्यासाठीचे काम करत आहेत तसेच त्यांनी करोना कालावधीत ही स्थलांतरित होऊन आलेल्या मुलांना झोपडपट्टीत जाऊन विविध उपक्रम घेतले. श्रीमती जमादार यांनी 2022 ते 2023 मध्ये ज्या मुलांना शाळेत दाखल केले त्यांना शाळेत टिकवण्यासाठी त्यांनी शाळाबाह्य मुलांनी घेतली **उंच भरारी हा नवा उपक्रम लिहिला आहे** .त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन

महाराष्ट्र शासन
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

**(श्रीम.अनुपमा तावशीकर)**
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
रत्नागिरी

**प्रति,**

१. **श्रीम. खालिदा जुबेर जमादार, विशेष साधन व्यक्ती ,** पंचायत समिती रत्नागिरी

---

**रत्नागिरी नगर परिषद शाळा क्र. २२**
**कोकण नगर उर्दू (आदर्श शाळा)**
स्थापना १६ जून २००१
कोकणनगर, रत्नागिरी. ४१५ ६३९.

رتناگری نگر پریشد اسکول نمبر ۲۲
کوکن نگر اردو (مثالی اسکول)
بنیاد: یکم ۱۶ جون ۲۰۰۱
کوکن نگر رتناگری ۴۱۵۶۳۹

जा. नं. : दिनांक : ०८/१२/२०२३

श्रीमती खालिदा जुबेर जमादार विषय साधन व्यक्ति पंचायत समिती रत्नागिरी यांनी सन. 2022-23 मध्ये झालेल्या सर्वेक्षणात त्यांना निदर्शनास आलेल्या दोन मुली 1) तहसिना अफझल शाह. व 2) शिफा अफझल शाह ह्या दोन्ही मुलींना आमच्या रत्नागिरी नगर परिषद शाळा क्र.22 कोकण नगर उर्दू शाळे मध्ये दाखल केले होते. परंतु आमची शाळा रस्त्याच्या पलीकडे असल्यामुळे त्यांना रस्ता क्रॉस करावा लागतो. त्या मुळे पालकांच्या विनंती मुळे त्या दोन्ही मुली आता रत्नागिरी नगर परिषद शाळा क्र. 27 कोकण नगर मराठी येथे शिक्षण घेत आहेत. तसेच सन. 2023/24 मध्ये श्रीमती खालीदा जमादार मॅडम यांनी 'तस्लीम नबी शेख' या मुलीला इयत्ता सहावी मध्ये वयानुरूप दाखल केले आहे. असे खालीदा मॅडम मुलांसाठी कोकण नगर परिसरात वारंवार भेट देत असतात. व मुलांच्या शिक्षणा साठी खूप प्रयत्न करत असतात. वाडीतील एक ही मुल शाळा बाह्य राहु नये त्यासाठी ही त्या प्रयत्नशील असतात. त्यांच्या शाळाबाह्य मुलांची उंच भरारी या उपक्रमाला आमच्या शाळेकडून मनःपूर्वक शुभेच्छा.

मुख्याध्यापिका
राष्ट्रपिता म. गांधी विद्यालय
र. न. प. शाळा क्र. २२
कोकण नगर ऊर्दू

---

**मराठा मंदिर**
रजि. नं. ई-३१२ (मुं.), बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट
**अ. के. देसाई हायस्कूल**
जुना माळनाका, बोर्डींग रोड, शिवाजीनगर, ता. जि. रत्नागिरी
स्थापना : १९४५


शाळा कायम मान्यता क्रमांक : ६७ (सी) सी (बी.आर) पुणा. तारीख २०.०४.१९६३
U-DISE NO. : २७३२०८२०१३५ शालार्थ आय. डी. ०४१४०१०००४० शाळा संकेतांक : २५.०८.०१८ (कोंकण विभाग)
फोन नंबर : ०२३५२-२२१६५७/३५५०२४ E-mail : mm.akdrtn@gmail.com

जावक क्रमांक : /२० -२० दिनांक : / /२०

श्रीमती खलिदा जुबेर जमादार विषय साधन व्यक्ती, पंचायत समिती, शिक्षण विभाग, रत्नागिरी हया बालरक्षक म्हणून काम करीत आहेत. त्यांनी २०२२-२०२३ मध्ये दिनांक २१/०९/२०२२ रोजी १) संगिता हरेंद्र पाल -इयत्ता ५ वी २) गजेंद्र हरेंद्र पाल - इयत्ता ६ वी ३) सुरज हरेंद्र पाल - इयत्ता ७ वी या तीन स्थलांतरीत झालेल्या मुलांना आमच्या प्रशालेत दाखल केले. त्यांच्या प्रगतीसाठी श्रीमती जमादार मॅडम शाळेत भेट देत असतात. त्यांना स्वत: अध्यापन करतात. श्रीमती जमादार मॅडम यांना त्यांच्या या कामासाठी आमच्या प्रशालेच्या वतीने शुभेच्छा देतो.

स्थळ : रत्नागिरी
दिनांक : ०९/१२/२०२३

मुख्याध्यापिका
मराठा मंदिर अ.के.देसाई
हायस्कूल रत्नागिरी



रत्नागिरी नगर परिषद शाळा क्र. १८

**राजिवडा उर्दू**

राजिवडा, रत्नागिरी - ४१५ ६१२. फोन : (०२३५२) २४१७०७


जा.क्र. :

दिनांक : ०९/१२/२०२३

श्रीमती खालीदा जुबेर जमादार साधन व्यक्ति पंचायत समिती शिक्षण विभाग रत्नागिरी.

श्रीमती खालीदा मॅडम यांनी 2022 या शैक्षणिक वर्षात मागील तीन वर्ष शाळेत न गेलेल्या व स्थलांतरित झालेल्या शाळा बाह्य कु. मेहेकअंजूम वस्ताद व जोया वस्ताद या मुलींना शाळेत दाखल केले. त्यांच्या प्रगती साठी व शैक्षणिक आढाव्यासाठी सतत भेट देतात व त्यांना स्वतःही अध्यापन करतात. राजिवडा झोपडपट्टीतील जावून मुलं शाळा बाह्य होऊ नये म्हणून ते सतत प्रयत्नशिल असतात. तसेच इतर मुलं ज्यांना त्या अध्यापन निष्पत्ती प्राप्त नाही त्यांच्यासाठी प्रयत्न करतात व अनियमित असणाऱ्या मुलांना शाळेत आणण्यासाठी सर्व शिक्षकांना मदत करतात. मागील सहा वर्षा पासून त्या आमच्या शाळेत शाळाबाह्य मुलींना दाखल करतात. शाळाबाह्य मुलांचे उंचभरारी या उपक्रमाला आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा

इन. मुख्याध्यापक
मौलाना अबुल कलाम आझाद विद्यालय
र. न. प. शाळा क्र. १८
राजिवडा उर्दू



**MISTRY HIGH SCHOOL,RATNAGIRI**
**Managed by**
**Taálimi Imdadiah Committee, Ratnagiri –Bombay**
**U - Dise Code: 27320820137 Index No. 2508008**
e-mail: mistryhighschool2@gmail.com

Ref. No. 2022-2023-2024 Date: 09.12.2023

प्रती,
श्रीमती खालिदा जुबेर जमादार
पंचायत समिती रत्नागिरी

श्रीमती खालिदा जुबेर जमादार विषय साधन व्यक्ती पंचायत समिती रत्नागिरी या बालरक्षक म्हणून मागील बरेच वर्ष आमच्या शाळेत शाळाबाह्य मुलांना दाखल करतात. 2022 23 मध्ये त्यांनी अब्दुल रहमान नबीलाल हिप्परगी इयत्ता पाचवी. व तिची बहीण सुहाना नबिलाली पोरगी इयत्ता आठवी यांना शाळेत दाखल केले आहे. तसेच आसिफ आगसमणी व त्याच्या भावंडांनाही श्रीमती जमादार मॅडम यांनी करोना कालावधीत दाखल केले होते परंतु परत ते कर्नाटक मध्ये गेले आणि जेव्हा जेव्हा ते दोन वर्षात आले त्यांना या शाळेत दाखल केले या वर्षात ही त्यांनी आसिफ दहावीत असताना त्याच्यासाठी प्रयत्न केले व त्याला शाळेत बोलऊन घेतले व सध्या तो शाळेत येत आहे. तसेच मुस्कान हिलाही श्रीमती जमादार प्राथमिक शाळेत दाखल केले होते सध्या ती हायस्कूलमध्ये शिकत आहे त्याच्या घरगुती अडचणीमुळे ती शाळेत गैरहजर असते पण तिला नियमित शाळेत आणण्यासाठी चाईल्ड ची मदत घेऊन त्याच्यात त्यांनी यश मिळविले आहे आणि सध्या मुस्कान शाळेत रोज येत आहे तसेच अंजुम मेहेक लाही त्यांनी नगरपरिषद क्रमांक 18 मध्ये दाखल केले होते सध्या ती इयत्ता सातवी मध्ये आमच्या शाळेत शिकत आहे.

Headmaster
Mistry High School,
Ratnagiri - 415 612
Dist. Ratnagiri



व्हिडीओ लिंक -1. https://youtu.be/QE6ZX_4xBzQ?si=Y5fjxw7ibuPJq114
2. https://youtu.be/PJqEqLRx4EU?feature=shared